
ओंडका आणि नौसेनाध्यक्ष बेडूक

बी. वाईसमैन

मराठी: अश्विनी बर्वे



मगर आणि नौसेनाध्यक्ष बेडूक

बी. वाईसमैन

मराठी: अश्विनी बर्वे






दोन बेडकांनी पाण्यातून एक ओंडका (मगरीला) त्यांच्याकडे येतांना बघितले. त्यांना ते लाकडाच्या ओंडक्यासारखेच काहीतरी दिसत होते.



“मला माहीत नव्हते की ओंडक्यालासुद्धा पाय असतात.

फ्रैडी बेडूक म्हणाले.



“नसतात,”

जॉर्ज म्हणाला,

“मगरीला पाय असतात!”



“पळ,” फ्रैडी हळू आवाजात म्हणाला.


“मला ही मगर बरोबर वाटत नाही.”




त्यांनी तिला आपल्या जवळ येऊ दिले कारण ओंडका चावत नाही. पण तेवढ्यात त्यांना त्याचा एक पाय दिसला.

आणि जशी त्यांनी उडी मारली ....ग्लॉप

त्यांच्या मागून दोन मोठे जबडे एकमेकांवर आपटले.





जेवढ्या लवकर बेडूक पळू शकत होते तेवढ्या जोरात ते पळाले.


त्यांनी इतरांना माहीती दिली.




एक म्हातारा ससा म्हणाला

“आपल्याला मगरीशी बोलावे लागेल.

आणि तिच्या बरोबर मैत्री करावी लागेल.





आणि तो पाण्याच्या जवळ आला आणि म्हणाला, “ये आपण मैत्री करू.”

मगरीने आपला जबडा उघडला जसे की तिला काही सांगायचे होते. पण

ग्लॉप!!!


काही म्हणण्याच्या ऐवजी सशाला खाण्यासाठी तिने झडप घातली.

इतरांनी सगळं बघितलं.

“आता आपण काय करू शकतो?” ते सगळे ओरडले.

“लढा!” एक तिखट आवाज ऐकू आला.

हा आवाज़ एका तरुण बेडकाचा होता ज्याला कोणी ओळखत नव्हते.





"पण कसे?" एका पक्ष्याने विचारले.

"तिचे दात टोकदार आहे, नखे आहेत आणि शेपूट सुद्धा आहे.!"

तरुण बेडूक म्हणाला.

"मला तुमच्या नौसेनेचा अध्यक्ष करा आणि मग बघा!"

"कोणती नौसेना? कोणाकडे आहे नौसेना?" पक्षी ओरडले.

"तुम्ही जर माझे म्हणणे ऐकले तर तुमची नौसेना असे."
तरुण बेडकाने विश्वास दिला.

युवा मेंढक ने विश्वास दिलाया.

पक्षी आणि इतर सर्व प्राण्यांनी आपापसात बातचीत केली.

त्यांनी त्याला नौसेनाध्यक्ष करण्याचा निर्णय घेतला.

तरुण बेडकाने एक पान घेतले आणि त्या पानापासून
त्याने नौसेनाध्यक्षाची टोपी तयार केली.




घासापासून त्याने आपला पट्टा तयार केला
आणि एक काठी त्याची तलवार झाली.



मग त्याने सर्वांना एकत्र बोलावले.

“कासवांनो तो म्हणाला, “आता तुम्ही आमच्या सेनेचे जहाज व्हा.तुम्ही पोहत जाल आणि तिला मागच्या बाजूने चावाल.“





“आणि तुम्ही छोटे पक्षी आमचे लढाऊ विमाने आहात.

तुम्ही वेगाने खाली उडत जा आणि तिच्यावर आपल्या चोचींनी हल्ले करा.”

“माशांनो तुम्ही आमच्या पाणबुड्या आहात. तुम्ही तिला खालून चावे घ्या. आणि तुम्ही,” तो मोठ्या पक्ष्यांना म्हणाला, “बॉम्ब वर्षक आहात. तिच्या डोक्यावर टाकण्यासाठी तुम्ही मोठ मोठे दगड घेऊन या”.







“सगळे बिव्हर किनाऱ्यावर एक बांध बांधतील. आणि स्कंक तुम्ही अश्रू धूर तयार ठेवा. तुमचे हेच काम आहे. चला, सगळ्यांनी माझ्या मागे या.”



नौसेनाध्यक्ष एका कासवाच्या डोक्यावर स्वार झाले.
तो सगळ्यात वर होता. उलटी मोजणी सुरु."
तो गरजला. १०-९-८-७-६-५-४-३-२-१– हल्ला!"






लढाऊ विमानांनी चोचींनी तिला मारले.
बॉम्ब वर्षाव करणाऱ्यांनी वरून दगड फेकले.

पाणबुड्यांनी तिला खालून तिला चावले.



तिला दिवसा तारे दिसू लागले आणि ती किनाऱ्यावर वेगाने जाऊ लागली, म्हणजे ती जमिनीवर येऊन कुठेतरी लपू शकेल.




पण तिथे किनाऱ्यावर एक उंच भिंत होती. जी बिव्हरांनी बांधली होती.



तेव्हा चार स्कंक तिथे आले आणि -

वूऊऊऊश!

ते जगातले अत्यंत दुर्गंधी सोडणारे प्राणी होते. (स्कंक असे करू शकतात!)



“थांबा, प्लीज़, थांबा!” ती ओरडली.

“तुम्ही जे म्हणाल ते मी करेन!”



“ठीक आहे,” नौसेनाध्यक्ष म्हणाले.

“मग वचन दे:

जेवढी दूर तू जाऊ शकते तेवढी दूर तू निघून जा आणि मग कधी इथे परत येऊ नको. “मी वचन देते!” ती जोरात म्हणाली. “ओह, मी नक्कीच इथे परत येणार नाही. आता मी जाऊ का? प्लीज?”



“हो, जा!” नौसेनाध्यक्ष गरजला.

ती रांगत पाण्यात गेली- थकलेली-हरलेली-दुर्गंधीने भरलेली.

मी इथे का आले होते याचा पश्चात्ताप करत आणि ...



एक मगर पाण्यात पोहत

दूरू निघून गेली.

